# ईश्वराचा परिचय

प्रत्येक माणूस ईश्वराला मानतो. ईश्वराबद्दलचा त्याचा दृष्टिकोन चूक असेल किंवा बरोबर पण तो कोणाला तरी ईश्वर मानून त्यापुढे नतमस्तक होतो. अगदी स्वतःला नास्तिक म्हणणारा माणूस सुद्धा संकटकाळी अनुभवतो की त्याला अशा एका शक्तीची गरज आहे जी त्याला संकटातून मुक्ती देऊ शकते.

प्रत्येकाच्या अंतःकरणावर ईश्वराचं चित्र छापलेलं आहे. ईश्वराला मानणं ही स्वाभाविक गोष्ट आहे. पण ईश्वरावर श्रद्धा ठेवताना आपण त्याच ईश्वरावर श्रद्धा ठेवत आहोत का जो आपल्या अंतःकरणावरील चित्राशी समरूप आहे याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज असते. म्हणूनच तर ईश्वराने प्रत्येकाला बुद्धी आणि विचार करण्याची शक्ती दिली. या गोष्टी सबंध प्राणिमात्रांमध्ये केवळ माणसाला त्याने दिल्या. माणसाने यांचा वापर करून ईश्वराला ओळखणं आणि ईश्वरकेंद्रित जीवन जगणं ईश्वराला अपेक्षित आहे.

निःसंशय माणसाला ईश्वराची गरज आहे. अशा परिस्थितीत तो जर ईश्वराला ओळखू शकला नाही तर तो आपल्या मनातील ईश्वरविषयक पोकळी भरण्यासाठी ईश्वराच्या निर्मितीलाच ईश्वराचा दर्जा देण्याची चूक करतो. पण दुर्दैवाने त्याच्या या चुकीमुळे त्याच्या मनातील पोकळी भरत नाही. खरा ईश्वर न सापडल्याने मनःशांतीपासून तो वंचित राहतो. ईश्वराच्या सहवासात न राहणाऱ्यांसाठी नाहीतरी बेचैनीशिवाय काय असणार आहे?

ही बेचैनी दूर करण्यासाठी तो या धर्मापासून त्या धर्माकडे, या देवस्थळापासून त्या देवस्थळाकडे भटकत राहतो. त्याला वाटतं सर्व विचारसरणी समान आहे, सर्व धर्म समान आहेत. कधी तो या धर्माच्या देवालयात नतमस्तक होताना दिसतो तर कधी दुसऱ्या धर्माच्या देवालयात तो आढळतो. आपल्या या कृत्याचे स्पष्टीकरण

करण्यासाठी तो आपण सर्वधर्मसमभावाचे अनुयायी आहोत असे सांगतो. वास्तविक पाहता हे फक्त स्वतःचं समाधान करणारं वाक्य असतं. खरी गोष्ट तर ही असते की त्याला ईश्वरच कळलेला नसतो. त्याच्या अंतःकरणावर छापलेला ईश्वरच त्याला सापडलेला नसतो. आणि परिणामस्वरूप तो इकडेतिकडे भटकत राहतो.

ईश्वर म्हणजे ईश्वर आहे. ईश्वर म्हणजे माणूस नाही. ईश्वर निर्माता आहे आणि त्याला सोडून इतर प्रत्येक गोष्ट - सजीव-निर्जीव, दृश्य-अदृश्य, ज्ञात-अज्ञात, सर्व काही त्याची निर्मिती आहे. तो कोणत्या बंधनात नाही आणि इतर प्रत्येक जण, प्रत्येक गोष्ट त्याच्या बंधनात आहे. तो पूर्णपणे शक्तिशाली आहे आणि त्याच्याशिवाय प्रत्येक जण असहाय आहे. कोणी काही करू शकतो याची हमी दिली जाऊ शकत नाही आणि ईश्वर कोणती गोष्ट करू शकत नाही अशी शंका उपस्थित केली जाऊ शकत नाही. त्याच्याकडे असलेल्या सर्व गोष्टी त्याच्या आहेत आणि इतर प्रत्येकाकडे असलेली कोणतीही गोष्ट त्यांची नाही. ती त्यांना ईश्वराकडूनच मिळालेली आहे, खऱ्या अर्थाने तोच त्यांचा मालक आहे. हे ईश्वराचं खरं चित्र आहे, प्रत्येकाच्या अंतःकरणावर छापलेलं हे चित्र आहे.

जेव्हा माणसाला ईश्वर खऱ्या अर्थाने कळतो तो गंभीर बनतो. तो कोणालाही ईश्वराचा दर्जा देऊ शकत नाही. तो ईश्वर सोडून कोणापुढेही नतमस्तक होऊ शकत नाही. कोणीच काहीही नाही आणि ईश्वर सर्व काही आहे हे त्याला पूर्ण अर्थाने कळलेलं असतं. थोड्या वेळेआधी प्रवचनामध्ये ईश्वराचं माहात्म्य सांगणारा महात्मा प्रवचन संपल्यावर जेव्हा पाय लांब करून लोकांना पाया पडू देतो त्याला ही कृती विसंगत वाटते. ईश्वराला ओळखलेल्या माणसाच्या जीवनात अशी विसंगती सापडू शकत नाही. कुणी त्याच्या पाया पडणं ही त्याचा थरकाप उडवणारी गोष्ट असते. ईश्वरापुढे नतमस्तक होण्याऐवजी माझ्यापुढे नतमस्तक होणं म्हणजे ईश्वराच्या प्रकोपात मला सुद्धा सहभागी करणं आहे या जाणिवेने तो हादरून जातो.

ईश्वराला ओळखलेला माणूस ईश्वर सोडून दुसऱ्या कोणापुढेही नतमस्तक होऊ शकत नाही. ईश्वराच्या शक्तीची आणि माणसाच्या असहायतेची त्याला जाणीव असते. त्याला माहीत असतं ईश्वराने माणसासाठी पृथ्वी राहण्यालायक बनविली, दुसरा कोणी माणसासाठी अशी पृथ्वी बनवून देऊ शकत नाही, चंद्राला राहण्यालायक

करून कोणी दाखवू शकत नाही. ईश्वराने सूर्य, चंद्र, पृथ्वी यांच्या फिरण्याच्या दिशा निश्चित केल्या. या दिशा बदलून कोणी सूर्याला पश्चिमेकडून उगवून दाखवू शकत नाही. भूकंप आला आणि त्यात खूप मोठी प्राणहानी झाली तर कोणती शक्ती त्या सर्वांना पुन्हा जिवंत करून दाखवू शकत नाही. समुद्राच्या क्रूर लाटांत सापडलेल्या जहाजाला कोणी काठावर आणू शकत नाही. ईश्वराशिवाय कोणाकडेही काहीही नाही. महिमा, प्रशंसा, प्रार्थना सर्व एकट्या ईश्वरासाठी आहे.

एका ईश्वराशिवाय कोणीच पूजेच्या लायक नाही याची प्रचिती जिकडे नजर पडेल तिकडे मिळते. प्रत्येक गोष्ट शांत सुरात हेच सांगत असते की ईश्वर महान आहे, फक्त त्याचीच प्रार्थना करा. कोणत्या माणसाने काही बनवलं असं काहीही नाही. माणसाची पूजा करू नका, निर्मितीची पूजा करू नका तर निर्मात्याची पूजा करा, ईश्वराची पूजा करा अशीच हाक प्रत्येक दिशेतील प्रत्येक गोष्ट देत असते.

विचार करा – रंगीबेरंगी फुले काळ्या चिखलाच्या मातीतून निघतात. कोण बनवू शकतो यांना? माणसाला तर हे सुद्धा माहीत नसेल की संपूर्ण पृथ्वीवर एकूण किती प्रकारची फुले आहेत. अमुक फुलाचा रंग थोडा वेगळा असता तर ते फूल जास्त चांगले दिसले असते असं एखाद्या फुलाबद्दल माणूस सांगू शकत नाही.

विचार करा – तऱ्हे तऱ्हेची फळे. वेगवेगळ्या चवीची, वेगवेगळ्या आकाराची, वेगवेगळ्या रंगांची. कोणी बनविली ही फळे? जमिनीच्या गर्भातून कशी निघाली ही बाहेर?

ईश्वराने निर्माण केलेल्या प्राण्यांची कल्पना करा. किती किती प्रकारचे प्राणी त्याने बनविले! त्यांना वेगवेगळा आकार दिला, वेगवेगळे रंग दिले. माणसाला तर हे सुद्धा माहीत नसेल की समुद्रात किती प्रकारचे मासे आहेत, पूर्ण पृथ्वीवर किती प्रकारचे प्राणी आहेत.

हिरवीगार शेते, पाण्याचे धबधबे, वाहत असलेल्या मोहक नद्या माणूस पाहत असतो. पण काय त्याने विचार केला की या सर्व गोष्टी त्या पृथ्वीवर अस्तित्वात आहेत ज्या पृथ्वीच्या गर्भात फक्त उष्णता आहे. जणू तो अशा बागेमध्ये राहत आहे जी आगीवर वसलेली आहे. ज्वालामुखीवर बसून जीवनाचा तो अनुभव घेत आहे. विचार करा – ईश्वराशिवाय कोण अशी निर्मिती करू शकतो?

पृथ्वी सूर्याचा एक ग्रह आहे जो सूर्याभोवती फिरतो. सूर्य व त्याभोवती फिरणाऱ्या या ग्रहांच्या समूहाला सूर्यमाला म्हटले जाते. अशा अब्जावधी सूर्यमाला आकाशगंगेमध्ये फिरत आहेत. पुन्हा अशा अब्जावधी आकाशगंगा या ब्रम्हांडामध्ये आहेत. विचार करा - माणूस कसं धैर्य करू शकतो ईश्वराला सोडून दुसऱ्यासमोर नतमस्तक होण्याचं? या ब्रम्हांडामध्ये पाच-सहा फुटाच्या माणसाची काही अवस्था तरी आहे का? विचार करा - संख्येत सांगता येणार नाही इतके ग्रह, तारे या ब्रम्हांडात सुरळीतपणे फिरत आहेत. कोण आहे यांना नियंत्रणात ठेवणारा? निःसंशय प्रार्थना फक्त त्या नियंत्रणकर्त्याचीच केली जाऊ शकते.

पृथ्वीच्या तुलनेत एका सर्वसामान्य सफरचंदाचा जो आकार असेल तसा सफरचंदाच्या तुलनेत अणूचा आकार असतो. अशा अणूंपासून प्रत्येक गोष्ट बनलेली आहे. अणूंची अवस्था सुद्धा एका सूर्यमालेप्रमाणे आहे ज्यात केंद्रस्थानी न्यूट्रॉन व प्रोटॉन आहेत तर त्यांच्याभोवती इलेक्ट्रॉन सेकंदाला कोट्यवधी वेळा अशा महावेगाने फिरत आहेत. माणूस ना अणूसारख्या अतिसूक्ष्म गोष्टीची कल्पना करू शकतो ना अतिबलाढ्य ब्रम्हांडाची. इतका असहाय आहे माणूस! आणि ईश्वर तो आहे ज्याने या सर्वांची निर्मिती केली आणि या सर्व गोष्टींच्या योग्य प्रमाणामुळे व योग्य स्थानामुळे हे जग चालत आहे. कोणत्या मानवी तंत्रज्ञानाचा किंवा बुद्धीचा यात हस्तक्षेप नाही.

खुद्द माणसाच्या शरीरात सुद्धा अब्जावधी पेशी आहेत आणि पुन्हा या सूक्ष्म पेशीतील घटक सुद्धा अब्जावधींच्या संख्येत आहेत. थोडक्यात माणसाची जेथेही नजर पडेल त्याला दिसेल की ईश्वराची प्रत्येक निर्मिती अद्‌भुत व चमत्कारिक आहे. प्रत्येक निर्मिती त्याला निर्मात्याच्या महान व सूज्ञ असण्याचा पुरावा देते. ईश्वराबद्दलचं त्याचं ज्ञान केवळ या गोष्टीचीच खात्री पटवून देईल की ईश्वराचीच पूजा केली जाऊ शकते. ईश्वराशिवाय कोणीच पूजेच्या लायक नाही.

मध्यंतरी एका सभेला एक सद्‌गृहस्थ संबोधत होते. कदाचित एखाद्या मातेचे ते भक्त असावेत. ते म्हणाले, ‘‘कभी डरको अपने मनमें मत आने दो. हमेशा यह याद रखो के माता तुम्हारे साथ है. माता कुछ भी कर सकती है.’’ हे वाक्य ऐकल्याबरोबर माझ्या मनात प्रश्न आला - माता कुछ भी कर सकती है म्हणजे नेमकं काय-काय करू शकते? जर वैज्ञानिकांनी जाहीर केलं की सूर्य आणि पृथ्वीचं अंतर कमी होत

आहे आणि लवकरच सूर्याच्या उष्णतेने पृथ्वीची राख होईल, तर काय कोणी सांगू शकेल – काळजी करू नका मी सूर्याला पुन्हा त्याच्या ठिकाणावर परत पाठवेन. खुद्द मी मातेचा कट्टर भक्त आहे म्हणणारी व्यक्ती सुद्धा सूर्य आणि पृथ्वी यांचं अंतर माता पूर्ववत करून टाकेल यावर विश्वास करणार नाही. माझ्यासाठी तर हे वाक्य की माता कुछ भी कर सकती है आणखीच विसंगत होतं. कारण त्या माता आता हयात सुद्धा नव्हत्या. जी व्यक्ती स्वतःला कायमसाठी लोकांमध्ये ठेवू शकत नाही, नेहमीसाठी तरुण आणि जिवंत राहू शकत नाही ती काहीही करू शकण्याचा दावा कसा करू शकते? याउलट ईश्वराचं घ्या. तो नेहमी जिवंत आहे, तो कधीच मरू शकत नाही, मृत्यू या संकल्पनेचा निर्माता तो आहे. प्रत्येक गोष्ट त्याच्या आधीन आहे. सूर्य, चंद्र, पृथ्वी, असंख्य ग्रह, सर्व काही त्याच्या आदेशाच्या बंधनात आहेत. निःसंशय तोच पूजेच्या लायक आहे. प्रशंसा आणि नमन फक्त त्याच्यासाठीच आहे.

कुराणात सुद्धा अशाच एका उदाहरणाचा उल्लेख आहे. कुराणात अब्राहमच्या जीवनकालाची एक घटना वर्णिलेली आहे. अब्राहम हे ईश्वराचे प्रेषित होते. ईश्वराचा प्रेषित म्हणजे तो ज्याच्याकडे ईश्वराचा संदेश येतो आणि त्याला तो प्रत्येकापर्यंत पोहोचवायचा असतो. अब्राहमने त्या काळाच्या राजाला हा संदेश दिला. त्यांनी सांगितलं की एका ईश्वराची प्रार्थना करा. तोच शक्तिशाली आहे. जीवन आणि मृत्यू सर्व काही त्याच्याच हातात आहे. राजा म्हणाला – जीवन आणि मृत्यू तर माझ्या सुद्धा हातात आहे. वाटेल त्याला मी मारू शकतो आणि वाटेल त्याला जिवंत सोडू शकतो. अब्राहमने त्याला सांगितले – माझा ईश्वर सूर्याला पूर्वेकडून उगवतो. काय तू त्याला पश्चिमेकडून उगवून दाखवू शकतोस? या विधानावर तो राजा निरुत्तर झाला. त्याने अब्राहमचा धर्म स्वीकारला नाही पण त्याच्याकडे अब्राहमला देण्यासाठी उत्तर नव्हते.

आता ना या जगात अब्राहम आहे ना त्यांच्या काळाचा तो राजा. पण अब्राहमने आपलं काम केलं. त्यांच्याकडे आलेला संदेश त्यांनी पोहोचवला. ईश्वराकडे त्यांच्यासाठी चिरकालीन आदर आहे, राहण्यासाठी सदैव स्वर्ग आहे. याउलट राजाने सत्याचा धिक्कार केला. त्याने त्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा वापर ईश्वराचे माहात्म्य स्वीकारण्यात करण्याऐवजी स्वतःचे माहात्म्य सांगण्यात केला. निरुत्तर झाल्यानंतर

सुद्धा सत्य न स्वीकारायचं त्याने ठरवलं. ईश्वराकडे त्याच्यासाठी क्रूर शिक्षा आहे. शाश्वत नरकाची शिक्षा आहे. अशीच प्रत्येकाची परीक्षा सुरू आहे. प्रत्येकाकडे तो जिवंत असेपर्यंत स्वातंत्र्य आहे. मृत्यूचा क्षण त्याच्या जीवनाचा अंत नाही तर त्याच्या स्वातंत्र्याचा अंत आहे. मृत्यूनंतरच्या जीवनात असहायपणे त्याला सत्याचा स्वीकार करावाच लागणार आहे. पण संधी संपल्यानंतरची ही स्वीकृती त्याला ईश्वराच्या प्रकोपापासून वाचवू शकणार नाही.

लोक ईश्वराला सोडून जेव्हा एखाद्या महात्मा किंवा महाराजाचे किंवा पीरबाबाचे भक्त बनतात तेव्हा त्यांच्याकडे सामान्यपणे अशी वाक्ये असतात – ‘‘माझ्या मुलीचं लग्न होत नव्हतं. मातेने आशीर्वाद दिला आणि लवकरच लग्न झालं.’’ ‘‘माझी प्रकृती खूप खराब झाली होती, जगण्याचा मार्ग दिसत नव्हता. महाराजांनी आशीर्वाद दिला आणि आज मी व्यवस्थित आहे.’’ ‘‘मी अमुक संकटात सापडलो होतो, मदतीसाठी कोणीही नव्हता, सगळ्या देवस्थानांच्या चकरा मारल्या पण काहीही झालं नाही. शेवटी अमुक दर्ग्यावर दयेची भीक मागितली आणि मी तेव्हापासून पूर्णपणे बरा आहे. आता घरी शांती आहे. मी तेव्हापासून नियमितपणे त्या बाबांचा भक्त आहे.’’

वास्तविक पाहता वरील वक्तव्ये पुरावाहीन आहेत. बोलणाऱ्याकडे याचा कसलाच पुरावा नसतो की त्याची अडचण दूर होण्यामध्ये अमुक गोष्टीचीच भूमिका आहे. म्हणूनच तर एकाच देवस्थानाबद्दल दोन विसंगत गोष्टी तुम्हाला ऐकायला मिळू शकतात. कुणी म्हणेल मी अमुक देवस्थानाला खूप विश्वासाने गेलो पण मला काही फायदा झाला नाही. दुसरा एखादा माणूस याच देवस्थानाबद्दल म्हणेल की मी तेथे गेलो आणि मला असा-असा फायदा झाला. खरं म्हणजे दोघांचीही विधाने चुकीची आहेत. कारण तो फक्त त्यांचा अंदाज आहे. जी गोष्ट घडली नाही ती फक्त यामुळे की त्या गोष्टीची निर्धारित वेळ आलेली नव्हती आणि जी गोष्ट घडली ती फक्त यामुळे की त्या गोष्टीची निर्धारित वेळ आलेली होती. आणि निर्धारित वेळ ईश्वराने ठरवलेली असते, कोणत्या माणसाने नाही. कोणत्या वेळेवर काय घडेल हे खात्रीपूर्वक कोणताही माणूस सांगू शकत नाही. त्यामुळे माणसाने फक्त ईश्वरालाच मदत मागितली पाहिजे आणि श्रेय सुद्धा ईश्वरालाच दिला पाहिजे. ईश्वराशिवाय श्रेयाचा कोणीच हक्कदार असू शकत नाही.

लोक म्हणतात अमुक गोष्ट जर खरी नाही तर इतके लोक त्या गोष्टीवर का श्रद्धा ठेवतात. एखादी गोष्ट खरी असण्याचा हा पुरावा होऊ शकत नाही की त्यावर किती लोक श्रद्धा ठेवतात. गोष्ट तर ती खरी असू शकते जी खरी आहे. एक माणूस मेलेला असेल आणि पृथ्वीवरील सर्व लोक सांगत असतील की तो जिवंत आहे. तर या सर्वांच्या सांगण्यामुळे ती वास्तविकता बदलणार नाही. तो काही उठून धावायला लागणार नाही. एखाद्याचे अब्जावधी जरी अनुयायी असतील तरी तो काय करून घेणार आहे? ईश्वराच्या प्रकोपापुढे कोणती संख्या काही अर्थ ठेवत नाही. ईश्वराच्या कोणत्याही निर्मितीची कल्पना करा आणि हे तुमच्या लक्षात येईल. कुणी अब्जावधींच्या संख्येमध्ये जरी असतील तरी विचार करा सामना त्या ईश्वराशी आहे जो निर्माता आहे अब्जावधी ताऱ्यांच्या अब्जावधी समूहांचा. आणि गंमत म्हणजे यातील एक जरी तारा पृथ्वीवर आला किंवा फक्त जवळच आला तरी पूर्ण मानवजात नष्ट होऊन जाईल. या नष्ट होणाऱ्यांमध्ये ईश्वराला सोडून दुसऱ्याची पूजा करणारे लोक सुद्धा असतील आणि ज्यांची पूजा केली जायची ते सुद्धा.

ईश्वराशिवाय कोणालाही दिल्या गेलेल्या श्रेयाची ईश्वराकडे अपराध म्हणून नोंद होईल. लोकांनी आपल्याला श्रेय द्यावं, आपली पूजा करावी अशी अपेक्षा ठेवणारे सर्व संत, महात्मे, वली आणि त्यांचे सर्व अनुयायी या सगळ्यांना ईश्वराकडे फक्त नरकाची शिक्षा आहे. यात नवल वाटण्यासारखी काही गोष्ट नाही. ईश्वराकडे मिळणारी ही शिक्षा एक न्यायपूर्ण गोष्ट असेल कारण या सर्वांनी ईश्वराने निर्माण केलेल्या गोष्टींचा क्षणोक्षणी उपभोग घेतला आणि मोबदल्यात त्याला काही दिलं नाही. ईश्वराने निर्मिलेलं ऑक्सिजन वापरून श्वास घेतला पण श्वास सुरू असेपर्यंत दुसऱ्याचेच भक्त बनून राहिले. बोलण्यासाठी ईश्वराने जीभ दिली आणि ती वापरली दुसऱ्याच्याच प्रशंसेसाठी. हात ईश्वराने दिले आणि जोडले दुसऱ्यासमोरच. निःसंशय हा न माफ केला जाणारा अपराध आहे. या अपराधाची शिक्षा चिरकालीन नरक आहे. ज्यात कधीच न संपणाऱ्या वेदना आहेत. वेदनांपासून मुक्ती मिळविण्यासाठी मृत्यू सुद्धा नाही. हा त्रास आहे कृतघ्नतेच्या मोबदल्यात मिळविलेला.

या पृथ्वीवर जीवन जगताना सुखासोबत दुःखाच्या सुद्धा घटना घडतात. कधी माणसाची सोय होते तर कधी अडचणी सुद्धा येतात. कधी चांगले अनुभव येतात तर

कधी वाईट अनुभव येतात. कधी तो तारुण्यात असतो तर कधी वृद्धापकाळात. दोन्ही तऱ्हेच्या गोष्टी या पृथ्वीवर आहेत – माणसाला हव्या वाटणाऱ्या सुद्धा आणि माणसाला नको वाटणाऱ्या सुद्धा . कारण ही पृथ्वी ईश्वराने माणसाला नेहमीसाठी राहायला बनवलेली नाही. येथे फक्त त्याला ईश्वराने दिलेल्या स्वातंत्र्याचा तो कसा वापर करतो हे दाखवायचे आहे. यानंतरच्या जगात मात्र ईश्वर दोन्ही गोष्टींची आणि दोन्ही लोकांची विभागणी करून टाकेल. या विभागणीचं नाव आहे स्वर्ग आणि नरक. सर्व चांगल्या गोष्टी व चांगले लोक स्वर्गाचे रहिवासी बनतील आणि सर्व वाईट गोष्टी व वाईट लोक नरकाचे रहिवासी. स्वर्गाच्या रहिवाशांना फक्त चांगले अनुभव येतील, फक्त सुखाच्या गोष्टी त्यांच्यासोबत घडतील, नेहमीसाठी ते तरुण असतील, मृत्यू, वृद्धापकाळ किंवा त्यांना नको वाटणारी कोणतीही गोष्ट तेथे त्यांना स्पर्श करणार नाही. याउलट सर्व प्रकारचे त्रास, सर्व प्रकारच्या अडचणी नरकात राहणाऱ्या लोकांच्या वाट्याला येतील. सोबतच आपण ईश्वराचे बनण्याची संधी गमवून टाकली हा कायमचा मनस्ताप व नैराश्याची भावना घेऊन त्यांना तेथे राहावं लागेल. ना बाहेर पडण्याचा कोणता मार्ग असेल ना मृत्यू त्यांची मुक्ती करेल.

सध्याचं जीवन परीक्षेचं आहे. येथे सुखदुःखाच्या गोष्टी घडत राहतात. माणूस त्यास कसा प्रतिसाद देतो ही त्याची परीक्षा आहे. म्हणून जेव्हाही एखादी चांगली गोष्ट घडते माणसाला ईश्वराचे आभार मानले पाहिजेत. स्वतःच्या योग्यतेने हे चांगलं घडलं असे मानून अहंकार न येऊ देता अधिक विनम्र बनले पाहिजे. आणि जेव्हा अडचणी येतात तेव्हा ईश्वराची मदत मागितली पाहिजे व नियोजनबद्ध पद्धतीने ती दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रयत्नाअंती जर अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही तर ईश्वर सोडून इतरांकडे धावपळ न करता सहनशक्ती दाखवली पाहिजे व ईश्वराशी एकनिष्ठ राहिले पाहिजे. निर्धारित वेळेवर जी गोष्ट व्हायची आहे ती तर घडणारच आहे. त्या गोष्टीसाठी इकडेतिकडे उड्या मारून आपला बालिशपणा दाखवायला नको. सहनशक्ती दाखवणाऱ्यांसाठी ईश्वराकडे अमाप मोबदला आहे.

नेहमी हा विचार केला पाहिजे की सुख असो वा दुःख या पृथ्वीवर मिळालेली कोणतीही गोष्ट सदैव राहणारी नाही. येथे अडचण येते तर अडचण जाते सुद्धा. म्हणून या किरकोळ गोष्टींकडे जास्त लक्ष न देता ईश्वराचा एकनिष्ठ बनून जीवन व्यतित केले

पाहिजे. ज्यांची ईश्वराकडे त्याचा एकनिष्ठ म्हणून नोंद झाली त्यांच्यासाठी ईश्वराकडे चीरकालीन स्वर्ग आहे. स्वर्गात ना कोणती अडचण आहे ना कोणता त्रास. कल्पना करा – ईश्वर म्हणजे किती महान निर्माता आहे. मागे काही उदाहरणे सुद्धा तुम्ही वाचलेली आहेत. अशा ईश्वराने त्याच्या एकनिष्ठ दासांना दिलेली स्वर्गाची ही भेट किती परिपूर्ण असेल. माणूस कल्पना सुद्धा करू शकणार नाही अशा आनंदात तो तेथे राहील. मग पृथ्वीवरच्या किरकोळ त्रासाकडे दुर्लक्ष करून आपली कामे करत राहण्यात काय हरकत आहे?

स्वर्ग म्हणजे माणसाचा हक्क नाही. ईश्वराकडून माणसाला मिळणारं ते एक बक्षीस आहे. हे बक्षीस त्या लोकांसाठी आहे ज्यांनी ईश्वराला ओळखलं. या पृथ्वीवर ईश्वर समक्ष नाही. पण जिकडे नजर पडेल तिकडे त्याची निर्मिती आपल्या निर्मात्याची महानता सांगत आहे. निर्मितीमधून निर्मात्याला ओळखायचं आहे. या गोष्टीची साक्ष द्यायची आहे की त्याच्याशिवाय कोणीच पूजेच्या लायक नाही. ही पहिली पायरी आहे. ही पायरी बुद्धीच्या पातळीवर झाली. आता कृतीच्या पातळीवर आपण ईश्वराला ओळखलेले आहोत हे दाखवण्यासाठी ईश्वरकेंद्रित जीवन जगायचे आहे. ईश्वरकेंद्रित जीवन म्हणजे कोणतेही पाऊल उचलताना ईश्वराचे स्मरण करणे. हे आठवण ठेवणे की ईश्वर मला पाहत आहे. मी त्याच्या नियंत्रणात आहे. आपल्याकडून इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे. प्रत्येक पावलावर ईश्वराचं भय बाळगणे.

जो माणूस ईश्वराला ओळखलेला असतो तो चुका करण्यास धजतच नाही. त्याने स्वतःला आधीच ईश्वराच्या आधीन करून टाकलेलं असतं. इतरांच्या जीवनात हस्तक्षेप करणारा माणूस जर म्हणत असेल की मी ईश्वराला ओळखलेले आहे किंवा मी ईश्वराचा भक्त आहे तर तो खोटं सांगत आहे. ईश्वराचं भय – कल्पना करता येणार नाही अशा शक्तिशाली ईश्वराचं भय – माणसाला चूक पाऊल कसं उचलू देईल? ईश्वराचा साक्षात्कार आणि आपल्या कल्पनेतील जीवन या दोन गोष्टी एकत्र येणाऱ्या नाहीत. ईश्वराचा साक्षात्कार आणि ईश्वरकेंद्रित जीवन या दोन गोष्टीच एकत्र येऊ शकतात. या दोन गोष्टींच्या आधारावरच ईश्वराकडे माणसासाठी काही दर्जा आहे.

अलीकडील झालेल्या ज्ञानाच्या विकासावरून वैज्ञानिकांच्या मते आणि प्राचीन

काळापासून धर्मांने केलेल्या भाकितानुसार आता पृथ्वीचा अंत जवळ आला आहे. अशा वेळेस आपल्या कल्पनेच्या जगात न राहता वास्तविकतेत येण्याची गरज आहे. गंमत करत न बसता गंभीर होऊन आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. जेव्हा आकाश फाटून जाईल, तारे अस्ताव्यस्त होऊन जातील, समुद्र ओसंडून वाहू लागतील, जीवनाचा कोणता मार्ग माणसाला दिसणार नाही. त्या दिवशी प्रत्येक माणूस स्वतःला शक्तिहीन पाहून घेईल. कोणी कोणत्या महात्माच्या पदरात लपू शकणार नाही किंवा कोणता महात्मा स्वतःला वाचवू शकणार नाही. त्या दिवशी सर्व ईश्वराच्या प्रकोपाखाली असतील आणि सुटकेचा कोणताच मार्ग असणार नाही. त्या दिवशी माफीचे दार बंद झालेले असतील आणि संधी संपून गेलेली असेल. फक्त ते लोक ईश्वराच्या कृपाछत्रात राहतील ज्यांनी हा क्षण येण्यापूर्वीच स्वतःला ईश्वराच्या आधीन करून टाकलं होतं. अशा लोकांना ना कोणत्या गोष्टीचं भय असेल कशाचा त्रास. हे लोक खऱ्या अर्थाने यशस्वी झालेले असतील.

आता माणसाकडे केवळ एकच पर्याय आहे. अश्रू भरलेल्या नयनांनी झालेल्या चुकांबद्दल त्याने ईश्वराला माफी मागावी. योग्य मार्गापासून परावृत्त करणाऱ्या सोबतींना व मार्गदर्शकांना सोडून ईश्वराच्या छत्रछायेत यावं. स्वतःच्या आत्म्याचं शुद्धीकरण करावं आणि आपण ईश्वराला नावडणारी कृती तर करत नाही याचं वेळोवेळी परीक्षण करावं. यासाठी प्रामाणिकपणे नेहमी ही प्रार्थना करावी की हे ईश्वर, मला सरळ मार्ग दाखव. तुझ्या प्रकोपाकडे जाईल अशा मार्गापासून वाचव आणि तुझ्या कृपेकडे येईल अशा मार्गावर चालव. माणसाला ईश्वराशी जुळवून घेण्यासाठी कोणत्या मध्यस्थाची गरज नाही. प्रत्येकाला ईश्वराने बुद्धी दिलेली आहे, केवळ विशिष्ट लोकांनाच त्याने बुद्धी दिली असे नाही. त्यामुळे प्रत्येकाने स्वतः विचार करण्याची गरज आहे, स्वतःचं नातं ईश्वराशी जोडण्याची गरज आहे. ईश्वराचं पुस्तक सत्य शोधणाऱ्यांना मार्ग दाखवायला नेहमीच तयार आहे.

ईश्वर आम्हा सर्वांची मदत करो आणि त्याला अपेक्षित असलेल्या मार्गावर चालवो – हीच त्याच्यापुढे विनम्र प्रार्थना.